# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट क्रमांक २४७/२०२४** **दिनांक-०१/०७/२०२४**

## “पोलीस भरती २०२२-२३ मैदानी चाचणी वेळी उमेदवारांकडे उत्तेजित द्रव्य मिळुन आल्याने उमेदवारांवर गुन्हे दाखल.”

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस भरती २०२२-२३ मैदानी चाचणी दिनांक २४/०६/२०२४ ते दिनांक ०१/०७/२०२४ रोजी पर्यंत मिरा-भाईंदर महानगरपालिका बेवर्ली पार्क मैदान, आरक्षण क्र. ३००, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस मुख्यालयाचे बाजुला मिरारोड पुर्व येथे पार पडली आहे.

दिनांक २८/०६/२०२४ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक मेन गेटवर कर्तव्याकरिता असताना पोलीस भरतीकरिता आलेल्या ०३ उमेदवारांकडे उत्तेजक पदार्थ सेवन करण्यासाठी लागणारे साहित्य मिळाल्याने त्यांची वैद्यकिय तपासणी करण्यात आली असुन त्यांचे विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. २०९/२०२४ भादविस कलम १८८, ५११ सह औषधीद्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम १९४० कलम १८८ (क) (१) प्रमाणे दिनांक २८/०६/२०२४ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पोलीस शिपाई भरतीकरिता आलेला ०१ उमेदवारा यांचेकडे देखील उत्तेजक पदार्थ सेवन करण्यासाठी लागणारे साहित्य मिळाल्याने त्याची वैद्यकिय तपासणी करण्यात आली असुन त्याचे विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. २१२/२०२४ भादविस कलम १८८, ५११ सह औषधीद्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम १९४० कलम १८८ (क) (१) प्रमाणे दिनांक ३०/०६/२०२४ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

---------00000---------